**Guidance on Quality Enhancement**

# 'नूतन मराठा'मध्ये गुणवत्तेसंबंधी मार्गदर्शन

जळगाव : जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी संस्था संचालित नूतन मराठा महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांमधील गुणवत्ता वाढीबाबत मार्गदर्शन वर्ग झाला. प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य संजय पाटील, पर्यवेक्षक प्रा. डी. वाय. पाटील, प्रा. पी. बी. लोंढे यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. वर्गात पुढील सात दिवस कला, वाणिज्य, विज्ञान शाखेच्या सर्व विषयासंबंधी मूल्यमापन आराखड्यानुसार तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन होणार आहे.